क्रमांक:१४३७८/क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक : २१ सप्टेंबर, २०२१.

**:: कार्यालयीन आदेश ::**

या सचिवालयातील तात्पुरत्या पदोन्नतीमुळे/प्रतिनियुक्तीमुळे रिक्त झालेल्या एस-१७-४७६००-१५११०० या वेतनस्तरातील **"कक्ष अधिकारी"** या पदावर सहायक कक्ष अधिकारी संवर्गातील खालील कर्मचाऱ्यांची निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आली आहे :-

| अ. क्र. | सहायक कक्ष अधिकाऱ्यांचे नाव |
|---|---|
| १. | श्रीमती ने.नं.काले, सहायक कक्ष अधिकारी |
| २. | श्री.रो.अ.कळसे, सहायक कक्ष अधिकारी |
| ३. | श्री.ना.ना.बनसोडे, सहायक कक्ष अधिकारी |
| ४. | श्री.कि.का.पाटील, सहायक कक्ष अधिकारी (सद्य:स्थितीत मा.समिती प्रमुख यांचे स्वीय सहायक म्हणून नियुक्तीने कार्यरत) |
| ५. | श्री.मं.रा.शेमणकर, सहायक कक्ष अधिकारी |
| ६. | श्री.क.श.जगताप, सहायक कक्ष अधिकारी |
| ७. | श्री.अ.प्र.हाटकर, सहायक कक्ष अधिकारी |
| ८. | श्री.म.आ.येसनसुरे, सहायक कक्ष अधिकारी |
| ९. | श्रीमती ध.क.जगताप, सहायक कक्ष अधिकारी |
| १०. | श्री.रा.ज्ञा.लिंगरवार, सहायक कक्ष अधिकारी |
| ११. | कु.वृ.वि.देशमुख, सहायक कक्ष अधिकारी |

२. संबंधित कर्मचाऱ्यांना कक्ष अधिकारी पदावर तात्पुरती पदोन्नती खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे:-

(अ) कक्ष अधिकारी संवर्गातील पदोन्नत्या तात्पुरत्या स्वरुपात प्रशासकीय निकड म्हणून देण्यात येत आहेत.

..२/-

(ब) या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधित कर्मचाऱ्यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

(क) सदरहू पदोन्नत्या कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी घेण्यात येणाऱ्या विभागीय परिक्षा उत्तीर्ण होण्याच्या अधिन राहून देण्यात येत आहेत. कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठीची विभागीय परिक्षा विहित संधीत उत्तीर्ण न झाल्यास, संबंधित कर्मचाऱ्यास सहायक कक्ष अधिकारी या पदावर पदावनत करण्यात येईल.

(ड) प्रतिनियुक्तीवर असलेले ज्येष्ठ कक्ष अधिकारी यांचे प्रत्यावर्तन झाल्यानंतर त्यांच्यासाठी कक्ष अधिकारी संवर्गात रिक्त पद उपलब्ध नसल्यास, या आदेशातील कनिष्ठतम कर्मचाऱ्याला पदावनत करण्याच्या अधीन सदर तात्पुरत्या पदोन्नत्या देण्यात येत आहेत.

(इ) कक्ष अधिकारी या पदावर सरळसेवेद्वारे उमेदवारांची नियुक्ती झाल्यानंतर कक्ष अधिकारी संवर्गात सरळसेवेचे रिक्त पद उपलब्ध नसल्यास, सरळसेवेच्या जागेवर कार्यरत असणाऱ्या कनिष्ठतम कर्मचाऱ्याला पदावनत करण्याच्या अधिन राहून सदर तात्पुरत्या पदोन्नत्या देण्यात येत आहेत.

३. अनुक्रमांक ४ वरील श्री.पाटील यांनी कक्ष अधिकारी पदावरील तात्पुरत्या स्वरुपातील पदोन्नती स्विकारल्यानंतर त्यांना या सचिवालयात रुजू व्हावे लागेल व ते रुजू झाल्यानंतर त्यांचे पदोन्नतीचे आदेश अंमलात येतील.

४. अनुक्रमांक ६ वरील श्री.जगताप यांची सेवा मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांच्या आस्थापनेवर उसनवार तत्त्वावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. श्री.जगताप यांनी आदेश प्राप्त झाल्यानंतर तात्काळ या सचिवालयाच्या आस्थापनेवर रुजू व्हावे.

आदेशानुसार,

(सुभाष नलावडे)
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति,**

**उपरोक्त सर्व संबंधित सहायक कक्ष अधिकारी.**

..३/-

**प्रतिलिपी :-**

१) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

२) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.

३) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

४) या सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.

५) कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

६) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

७) 'क-२' (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

८) वैयक्तिक नस्ती.

९) निवडनस्ती.